आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८०५ वाजता

४ डिसेंबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडनवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब /महायुतीचा राज्यपालांकडे सत्तास्थापनेसाठी दावा, उद्या संध्याकाळी शपथविधी

- राज्यसभेत, अन्नधान्याची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी कायदा करण्याची मागणी करत विरोधकांचा सभात्याग, बॉयलर दुरुस्ती विधेयक, २०२४ राज्यसभेत मंजूर

- दक्षिण कोरियामधे अध्यक्ष यून सुक योल यांच्यावर महाभियोग चालवण्याचा विरोधी पक्षांचा संसदेत प्रस्ताव

**आणि**

- पुरुषांच्या हॉकी ज्युनियर आशिया चषक स्पर्धेच्या विजेतपदासाठी आज भारताची पाकिस्तानशी लढत

**<><><><><>**

राज्याच्या मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडनवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इतर नेत्यांच्या उपस्थितीत ते उद्या महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. भाजपाच्या गाभा समितीच्या आज झालेल्या बैठकीत भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी फडनवीस यांची निवड करण्यात आली. या प्रक्रियेसाठी मुख्य निरीक्षक म्हणून केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यावेळी उपस्थित होते. नवनिर्वाचित आमदार

चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी फडनवीस यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व आमदारांनी पाठिंबा दिल्यानंतर पक्षनेतेपदी फडनवीस यांची निवड जाहीर करण्यात आली.

महायुतीच्या नव्या सरकारचा शपथविधी उद्या संध्याकाळी मुंबईच्या आझाद मैदानावर होणार आहे. मुख्यमंत्रीपदाची शपथ फडनवीस तिसऱ्यांदा घेणार आहेत, तसंच उपमुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांचा शपथविधीही होणार आहे. फडनवीस यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यामुळे धुळे, नंदुरबार जिल्ह्यातल्या भाजपा कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला आहे.

**<><><><><>**

महायुतीच्या नेत्यांनी आज राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन सत्ता स्थापनेचा दावा केला. यावेळी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडनवीस, अजित पवार, आणि इतर नेत्यांनी भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्रपक्षांच्या एकूण २३७ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र राज्यपालांना दिलं. यावेळी केंद्रीय मंत्री निर्मला सितारामन, आणि भाजपा नेते विजय रूपाणी देखील उपस्थित होते.

राज्यपालांकडे जाण्याआधी एकनाथ शिंदे, देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार यांची बैठक झाली. त्यानंतर, हे तिन्ही नेते एकाच गाडीतून राजभवनाकडे रवाना झाले.

**<><><><><>**

महायुतीचे प्रमुख नेते देवेंद्र फडनवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेऊन नव्या सरकारच्या शपथविधी

सोहळ्याची माहिती दिली. महायुतीत आतापर्यंत सर्व निर्णय एकत्रितपणे घेतले गेले असून यापुढेही एकत्र राहून निर्णय घेऊ, असं भाजपा विधिमंडळ पक्ष नेते देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी सांगितलं.

महायुतीला विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाचा उल्लेख करत फडनवीस यांनी जनतेचे तसंच भाजपा नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, जेपी नड्डा आणि आरपीआयचे अध्यक्ष रामदास आठवले यांचे आभार मानले. नवं सरकार राज्याच्या प्रगतीसाठी काम करेल, असं देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले.

**बाईट फडनवीस - होल्ड (३६ सेकंद)**

महायुती सरकारनं गेल्या अडीच वर्षाच्या कार्यकाळात अनेक लोककल्याणकारी उपक्रम राबवले असून नव्या सरकारमध्येही एकसंधपणे काम करू असं शिवसेना मुख्य नेते **एकनाथ शिंदे** यांनी सांगितलं. तर राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी, तसंच विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न करू, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष **अजित पवार** म्हणाले.

**<><><><><>**

राज्यसभेत आज, अन्नधान्याचे किमान आधारभूत दर निश्चित करण्यासाठी कायदा करण्याची मागणी करत विरोधकांनी सभात्याग केला. आज सकाळी कामकाज सुरू झाल्यानंतर एमएसपी, फेंजल चक्रिवादळ, संभल हिंसाचार आणि अदानी लाचखोरी प्रकरणावर विरोधी पक्षांनी सादर केलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. गेल्या आठवड्यात विरोधकांनी गोंधळ करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर स्थगन

प्रस्ताव का दिला नाही, या धनखड यांच्या प्रश्नावर काही विरोधकांनी आक्षेप घेतला. त्यानंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, आप, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांच्या सदस्यांसह इतर सदस्यांनी सभात्याग केला.

**<><><><><>**

बॉयलर संदर्भातला शंभर वर्षं जुना कायदा रद्द करून, बॉयलर दुरुस्ती विधेयक, २०२४ आज राज्यसभेत मंजूर झालं. या विधेयकाच्या मंजुरीनंतर केंद्र सरकार केंद्रीय बॉयलर मंडळाची स्थापना करू शकणार आहे, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज राज्यसभेत दिली. या विधेयकात बॉयलरमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेसाठी विशेष तरतूद केली आहे. तसंच, बॉयलरच्या दुरुस्तीच्या कामासाठी सुयोग्य आणि सक्षम तंत्रज्ञ नेमला जाणं अनिवार्य असेल. देशातल्या ४० लाखांहून अधिक बॉयलर्सना याचा लाभ मिळणार आहे. बॉयलर्समध्ये काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षा मिळवून देणं, हेच या विधेयकामागचं उद्दिष्ट असल्याचंही पीयूष गोयल यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

दक्षिण कोरियामधे अध्यक्ष यून सुक योल यांच्यावर महाभियोग चालवण्याचा प्रस्ताव विरोधी पक्षसदस्यांनी संसदेत मांडला आहे. यून सुक योल यांनी काल अचानकपणे लष्करी राजवट लागू केली होती. त्याबद्दल त्यांच्यावर टीकेचा वर्षाव झाला. हजारो नागरिक निदर्शनं करीत रस्त्यावर उतरले होते. त्यामुळे अवघ्या ६ तासात यून यांनी निर्णय मागे घेतला. या महाभियोग प्रस्तावावर येत्या शुक्रवारी मतदान होईल, असं विरोधी पक्ष

सदस्य किम योंग मिन यांनी सांगितलं. ६ राजकीय पक्ष या प्रस्तावाला पाठिंबा देणार असल्याचं ते म्हणाले. प्रस्ताव मंजूर होण्यासाठी किमान दोन तृतीयांश सदस्यांची मतं आवश्यक आहेत. ३०० सदस्यांच्या सभागृहात सत्ताधारी पक्षाचं संख्याबळ १०८ आहे. महाभियोग प्रस्ताव मंजूर झाल्यास यून यांना पदावरुन निलंबित केलं जाईल आणि संवैधानिक न्यायालयात त्यांच्या बडतर्फीबाबतचा निर्णय होईल.

दरम्यान दक्षिण कोरियातल्या भांडवली बाजाराचा निर्देशांक कोस्पी आज कालच्या तुलनेत दीड टक्के घसरुन बंद झाला.

<><><><><>

ओमान इथं सुरू असलेल्या पुरुषांच्या हॉकी ज्युनियर आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. थोड्याच वेळात, म्हणजे साडे आठ वाजता हा सामना सुरू होईल.

काल या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारतीय संघानं मलेशियाला ३-१ ने नमवत अंतिम फेरी गाठली होती. तर पाकिस्तानी संघानं जपानच्या संघावर ४-२ असा विजय मिळवला होता. या स्पर्धेत भारतीय संघ अपराजित राहिला आहे. या स्पर्धेचं विजेतेपद म्हणजे भारतीय संघासाठी विजयाची हॅटट्रिक असणार आहे.

<><><><><>

क्रिकेटमध्ये १९ वर्षांखालील आशिया कप स्पर्धेत भारतानं संयुक्त अरब अमिरातीवर दहा गडी राखून विजय मिळवला. यूएईच्या १३८ धावांचं आव्हान भारतानं सतराव्या षटकातच पूर्ण केलं. आयुष म्हात्रेनं ६७ तर वैभव सूर्यवंशीने ७६ धावा करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.

त्याआधी संयुक्त अरब अमिरातीनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. रायन खानच्या ३५ आणि अशत रायच्या २६ धावा वगळता यूएईचे अन्य फलंदाज फारशी चमकदार कामगिरी करू शकले नाहीत. भारताच्या युद्धाजित गुहा याने तीन तर चेतन शर्मा आणि हार्दिक राज यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

<><><><><>

झारखंडमधे हेमंत सोरेन सरकारच्या विस्तारित मंत्रीमंडळाच्या सदस्यांचा शपथविधी उद्या दुपारी रांची इथं होणार आहे. यावेळी ११ जणांना राज्यपाल संतोषकुमार गंगवार पद आणि गोपनियतेची शपथ देतील. त्यात झारखंड मुक्ती मोर्चाचे -४, काँग्रेसचे-४, तर राष्ट्रीय जनतादलाच्या एका मंत्र्याचा समावेश असेल.

<><><><><>

येत्या शुक्रवारी जाहीर होणार असलेलं वित्त धोरण आखण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या वित्त धोरण समितीची मुंबईत बैठक सुरु झाली.

रिझर्व्ह बँकेनं फेब्रुवारी २०२३ पासून रेपो दरात कोणताही बदल केलेला नसून तो ६ पूर्णांक ५ टक्क्यावर स्थिर राखला आहे.

<><><><><>

संसद सदस्यांनी भवनाच्या प्रवेशद्वारासमोर निदर्शनं करू नयेत, अशी विनंती लोकसभा सचिवालयानं केली आहे. अशा निदर्शनांमुळे सदस्यांना कामकाजासाठी सभागृहात जायला अडथळा होतो तसंच त्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न उद्भवू शकतो, असं सचिवालयानं म्हटलं आहे.

//<><><><><>//